4	Remote e-voting period	• Commence from **Friday, September 18, 2026 at 09:00 hrs (IST)** • Ends on **Tuesday, September 22, 2026 at 17:00 hrs (IST)** Members to note that remote e-voting module shall be disabled by NSDL beyond 17:00 hrs (IST) on Tuesday, September 22, 2026. The manner of remote e-voting for Members holding shares, who have not registered their email addresses is provided in the AGM Notice. Once the vote on a resolution is cast by a Member, the Member shall not be allowed to change the same subsequently. Members who have cast their vote by remote e-voting prior to AGM may attend the AGM through VC/ OAVM but shall not cast their votes again. Members who have not cast their vote through remote e-voting shall be eligible to cast their vote through e-voting system available during the AGM. E-voting during AGM is integrated with VC/ OAVM platform.
5	Scrutinizer for e-voting	**Mr. Pradeep Bheemsen Kulkarni** **Practicing Company Secretary** (ICSI Membership No. F7260 and CP: 7835) of M/s. V Sreedharan & Associates, Company Secretaries, Bengaluru **Email:** pbk@sreedharancs.com
6	RTA Contact Details	**Integrated Registry Management Services Private Limited** 2nd Floor, "Kences Towers" No. 1 Ramakrishna Street, North Usman Road T Nagar, Chennai - 600 017 Phone: 044-28140801 to 28140803 Fax : 044-28142479 E-mail: Einward@IntegratedIndia.in
7	Helpline details for any query/ grievance/technical assistance and support, before or during the AGM for VC participation and e-voting	Members facing any technical issue in login can contact NSDL helpdesk by sending a request at www.evoting.nsdl.com or call at 022 - 4886 7000

Register your e-mail ID:

Members who have not registered their email IDs with Depository Participants are requested to register the same with their Depository Participants in respect of shares held by them.

Login details for Members who become Members of the Company after the dispatch of AGM Notice and holds shares as on the cut-off date for e-voting:

In case of Individual Members who acquired shares of the Company and became a Member of the Company after the dispatch of AGM Notice and hold shares as on the cut-off date for e-voting i.e., Wednesday, September 16, 2026, may follow steps mentioned in the Notice of the AGM under "General instructions for accessing and participating in the AGM through Video Conference/ Other Audio Visual Means (VC/ OAVM) Facility and voting through electronic means including remote e-Voting".

For any **query/ clarification/ assistance** required with respect to the Annual Report for FY 2025-26 or the AGM, Members may write to investor-relations@onesourcecdmo.com.

By order of Board of Directors
For OneSource Specialty Pharma Limited
Sd/-
Trisha A
Company Secretary & Compliance Officer
ICSI Membership No.: A47635

Place: Navi Mumbai
Date: August 31, 2026

राज्यातील ६७ जणांच्या संपर्कासाठी प्रयत्न जारी

रिचा टूर्समधील ६० नागरिक अद्याप संपर्काबाहेर

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

नेपाळच्या महाप्रलयाचा फटका बसलेल्या महाराष्ट्रातील यात्रेकरुंची संख्या ४०५ पर्यंत पोहोचली असून रिचा टूर्स प्रा. लि. या संस्थेमार्फत गेलेल्या ६० नागरिकांच्या गटाशी अद्याप थेट संपर्क प्रस्थापित झालेला नाही. हे सर्वजण मुंबईतील हिल्स ॲण्ड ट्रेल्सच्या नेतृत्वात यात्रेला गेले. त्याचे नेतृत्व करणारे डॉ. मिलिंद चितळे दाम्पत्यही बेपत्ता आहे.

राज्यातील २६२ नागरिकांना स्वगृही आणण्यासाठी यशस्वी कार्यवाही होत असून उर्वरित ७६ यात्रेकरू संपर्कात असून सुरक्षित आहेत. अन्य ७ नागरिकांची लिंकद्वारे नोंद झाली असून त्यांच्याशीही अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. या व्यक्तींचा ठावठिकाणा व माहिती मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पर्यटकांच्या शोधासाठी केंद्र सरकारचे विशेष पथक काठमांडू येथे दाखल झाले आहे. भारताचे नेपाळमधील राजदूत यांनीदेखील या पथकाची भेट घेऊन आवश्यक सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनांनुसार प्रवासातील अडचणी दूर करण्याबरोबरच विविध प्रकारची मदत उपलब्ध केली आहे.

राज्यातील आणखी ६९ नागरिकदेखील पुढील प्रवास करून मुंबईत पोहोचतील. यापूर्वी तिबेटमधील मानसरोवरजवळील सागा येथून ३७ नागरिक २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी मुंबईत सुखरूप पोहोचले आहेत.

नाव वगळलेल्या मतदारांना अद्यापही संधी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या स्पेशल इन्टेन्सिव रिव्हिजन (SIR) अंतर्गत प्रारूप मतदार यादीतून राज्यातील तब्बल २ कोटी ७ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. जर तुमचे नाव या प्रारूप यादीत नसेल, निवडणूक आयोगाने नागरिकांना त्यांचे नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतची मुदत दिली आहे. या १ महिन्याच्या कालावधीत नागरिक आपले दावे आणि हरकती नोंदवू शकतात.

यादीत नाव कसे तपासावे?

पाच पर्याय

- डाऊनलोड करा.
- मोबाईल नंबर टाकून लॉग इन करा.
- तुमचा नंबर मतदार क्रमांक टाका.
- माहिती बरोबर करा.
- चूक असल्यास कागदपत्रे लोड करा.

सर्वात आधी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या (CEO) अधिकृत संकेतस्थळावर किंवा निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या पोर्टलला भेट देऊन ड्राफ्ट रोलमध्ये तुमचे नाव आहे की नाही, याची खात्री करा.

नाव गायब असल्यास (फॉर्म ६)

जर तुमचे नाव यादीत नसेल, तर ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी फॉर्म नंबर ६ भरून आवश्यक कागदपत्रांसह आपले नाव पुन्हा जोडण्यासाठी दावा सादर करा.

आक्षेप नोंदवण्यासाठी (फॉर्म ७)

एखाद्या अपात्र किंवा मृत व्यक्तीचे नाव चुकून यादीत आले असल्यास त्यावर आक्षेप घेण्यासाठी फॉर्म नंबर ७ चा वापर करा.

दुरुस्ती किंवा पत्ता बदलण्यासाठी (फॉर्म ८)

मतदार ओळखपत्रातील नावाचे स्पेलिंग दुरुस्त करणे, पत्ता बदलणे किंवा इतर सुधारणांसाठी फॉर्म नंबर ८ भरावा लागेल.

अंतिम यादीत नाव नोंदवण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

यादीत नाव नसल्यास हे १४ पुरावे आवश्यक

ज्यांचे मॅपिंग होणार नाही, त्यांच्यासाठी निवडणूक आयोगाने 'आधार'सह पर्यायी कागदपत्रे अधिसूचित केली आहेत. २००२ च्या मतदार यादीत नाव असणाऱ्यांना (ज्यांचा जन्म १९८७ पूर्वी झाला आहे) कोणत्याही पुराव्याची गरज नाही. इतरांनी इन्युमरेशन फॉर्मवर अचूक माहिती आणि स्वाक्षरी दिली, तरी ड्राफ्ट यादीत नाव समाविष्ट होईल. त्यासाठी लागणारी कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत

- २००२ पूर्वीची मतदार यादी किंवा जुनी निवडणूक पावती
- **मालमत्तेची कागदपत्रे, भाडेकरू असल्याच्या नोंदी**
- नागरिकत्व प्रमाणपत्र
- **रहिवासी प्रमाणपत्र**
- निर्वासित नोंदणी प्रमाणपत्र
- **पासपोर्ट**
- एलआयसी पॉलिसी
- **शासनाने दिलेला अधिकृत परवाना**
- शासकीय किंवा निमशासकीय नोकरीचे प्रमाणपत्र
- **बँक किंवा पोस्टाचे पासबुक**
- जन्म प्रमाणपत्र
- **बोर्ड किंवा विद्यापीठाचे शैक्षणिक प्रमाणपत्र**
- कोर्टाच्या नोंदी किंवा कायदेशीर कागदपत्रे
- **रेशन कार्ड, शासकीय ओळखपत्र.**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे रुग्णालयात दाखल; प्रकृती स्थिर

पारनेर : पुढारी वृत्तसेवा

ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांना व्हायरल इन्फेक्शन आणि डिहायड्रेशनमुळे उपचारासाठी मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. अतिदक्षता विभागात हजारे यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. गौतम भन्साळी यांनी दिल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, अण्णा हजारे दोन-तीन दिवसांपासून आजारी असल्याने त्यांच्यावर शिरूर (जि पुणे) येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. गेल्या काही दिवसांपासून प्रकृतीच्या कारणामुळे ते सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर आहेत. शिरूर येथे हजारे यांच्या रक्ताच्या चाचण्यांमध्ये त्यांना युरिन इन्फेक्शन असल्याचे समोर आले होते. त्यानुसार प्राथमिक उपचारांनंतर त्यांना मुंबई येथील बॉम्बे हास्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. दरम्यान, अण्णा हजारे यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल केल्याची माहिती समजताच राळेगणसिद्धी व पारनेर परिसरात, तसेच जिल्ह्यात काळजीचे वातावरण असून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना केली जात आहे.

मुंबईत ३६ लाख मतदार वगळले

पान १ वरून... नावेही वगळली गेली आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात १ कोटी ५६ लाख मतदार वगळले गेले आहेत. यातील जे पात्र मतदार आहेत, त्यांना पुन्हा नाव नोंदवण्याची संधी असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी सांगितले.

प्रारूप यादीवर मंगळवार दि.१ सप्टेंबरपासून हरकत, दावे करता येणार आहेत. याबरोबर नव्याने मतदार नोंदणीसाठी मतदारांना अर्जही करता येणार आहे. प्रारूप मतदार यादीत समावेश नसलेल्या व योग्य पुरावे असलेल्या मतदारांना त्यांनी योग्य पुरावे सादर केल्यानंतरच त्यांची नावे अंतिम मतदार यादीत समावेश केली जाणार आहेत. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

३० जून ते १७ ऑगस्ट या कालावधीत एसआयआरची प्रक्रिया झाली. सर्व मतदारांना मतदान गणना अर्जाचे वाटप करून ते त्यांच्याकडून भरून घेण्यात आले. जमा झालेल्या अर्जांचे निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर स्कॅनिंग करण्यात आले.

मतदार यादीत समाविष्ट न झालेली मतदारांची जिल्हानिहाय संख्या	
जिल्हा	मतदार संख्या
नंदूरबार	१,८८,७२९
धुळे	२,१४,८५७
जळगाव	५,१४,७४३
बुलडाणा	१,१०,१३७
अकोला	२,७६,११२
वाशिम	१,३४,२५०
अमरावती	३,५३,२८२
वर्धा	१,७८,१७८
नागपूर	१४,४३,२६७
भंडारा	१,३३,३७१
गोंदिया	१,६०,६४३
गडचिरोली	९०,६०३
चंद्रपूर	२,७०,१०४
यवतमाळ	२,६४,१४८
नांदेड	३,८८,३५२
हिंगोली	८५,३०९
परभणी	१,८०,२३१
जालना	२,४३,१८३
छत्रपती संभाजीनगर	६०,७६,६०
नाशिक	१०,२७,७९२
ठाणे	२८,५९,३७७
मुंबई उपनगर	२६,५८,२०२
मुंबई शहर	१५,०७,२०
रायगड	५८,४१,१८
पुणे	२८,६६,४८१
अहिल्यानगर	४२,६९,१५
बीड	२,४०,४०७
लातूर	२१,४४,४२
धाराशिव	१८,१५,४५
सोलापूर	६२,२६,७१
सातारा	३४,१९,०५
रत्नागिरी	१,३१,५६९
सिंधुदुर्ग	८२,५१३
कोल्हापूर	४,४९,२१३
सांगली	३८,२२,६९
पालघर	६,६८,७०९
एकूण	२,०६,८८,४८७

धावत्या स्लीपर बसमध्ये १६ वर्षीय विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार

पान १ वरून... तिने मैनपुरी येथून बस पकडली. मात्र दिल्ली-एनसीआर परिसरात सुरू असलेला मुसळधार पाऊस व अंधारामुळे ती चुकून नोएडातील परी चौक परिसरात उतरली.

मदतीचा बहाणा करून बसमध्ये घेतले

पावसात अडकलेल्या या मुलीने रस्त्यावरून जाणाऱ्या 'विश्वनाथ' नावाच्या एका रिकाम्या स्लीपर बसला हात दाखवून थांबवले. तिने विचारणा केली असता, बसचा वाहक संदीप याने ही गाडी सेक्टर ६३ च्या दिशेने जात असल्याचे सांगून तिला बसमध्ये बसवले. भर पावसात मदतीची गरज असल्याने ती मुलगी त्या रिकाम्या बसमध्ये चढली. बस काही अंतर पुढे जाताच वाहक संदीपने तिच्याशी चाळे करण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही क्षणातच बसचा चालक कुलदीप आणि वाहक संदीप या दोघांनी मिळून चालत्या बसमध्ये तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. या भयंकर कृत्यानंतर कोणालाही माहिती दिल्यास जीवे मारण्याची धमकी आरोपींनी दिली. त्यानंतर पीडितेला काश्मिरी गेट बस स्थानकाजवळ सोडून दोघेही बससह तिमारपूरच्या दिशेने पसार झाले.

तपासात खुलासे, फॉरेन्सिक पुरावे जप्त

घटनेचा तपास करण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तयार करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. फुटेजच्या तांत्रिक विश्लेषणावरून पोलिसांनी तिमारपूर भागातील एका पार्किंगमधून दोन्ही संशयित आरोपींना (चालक कुलदीप आणि वाहक संदीप) अटक केली. स्लीपर बसच्या बर्थला पडदे लावलेले होते, जेणेकरून बाहेरून काही दिसणार नाही. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळ असलेल्या बसमधून पीडितेचे केसांचे नमुने आणि इतर महत्त्वाचे जैविक पुरावे जप्त केले आहेत.

नेमके काय घडले?

कौटुंबिक वादानंतर घर सोडले : अभ्यासावरून वाद झाल्याने घर सोडून निघालेली अकरावीची विद्यार्थिनी मुसळधार पावसात रस्ता चुकली.

चालत्या बसमध्ये अत्याचार : 'विश्वनाथ' नावाच्या रिकाम्या स्लीपर बसमध्ये चालक आणि वाहकाने मिळून केला बलात्कार.

काश्मिरी गेट परिसरात सोडले : अत्याचाराच्या घटनेनंतर पीडितेला रस्त्यावर सोडून आरोपी बस घेऊन पसार झाले.

फॉरेन्सिक पुरावे व अटक : सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी तिमारपूरमधून दोन्ही आरोपींना केली अटक, फॉरेन्सिक तपासणी सुरू.

अश्लील ॲप्सद्वारे बँक खात्यांवर डल्ला

सायबर सेलचा अँड्रॉईड यूजर्सना सतर्कतेचा इशारा

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

सोशल मीडियावरील जाहिरातींच्या माध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या बनावट आणि अश्लील (पोर्नोग्राफिक) ॲप्सद्वारे आर्थिक फसवणुकीचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचा इशारा नॅशनल सायबर क्राईम थ्रेट ॲनालिटिक्स युनिटने दिला आहे. ही युनिट केंद्रीय गृह मंत्रालयाच्या 'इंडियन सायबर क्राईम को-ऑर्डिनेशन सेंटर' अंतर्गत कार्यरत आहे. हे मलवेअर अँड्रॉईड फोनचा पूर्ण ताबा घेऊन खात्यांमधून परस्पर व्यवहार करू शकतात.

बनावट जाहिरातींचा सुळसुळाट

सायबर सेलच्या माहितीनुसार, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर आकर्षक जाहिराती देऊन यूजर्सना आकर्षित केले जात आहे. 'नाईट प्ले', 'रिलूप', 'किस', 'विमो', 'रिव्हो', 'नेक्सो' आणि 'विक्सा' या नावांनी हे ॲप्स चालवले जात आहेत.

अशी होते फसवणूक

1. फिशिंग लिंक्स : जाहिरातींवर क्लिक करताच यूजर्सना अशा वेबसाईटवर नेले जाते, ज्यांचे डोमेन प्रामुख्याने .live ने संपतात.
2. थेट एपीके डाऊनलोड : गुगल प्ले स्टोअरच्या बाहेरून यूजर्सना थेट 'एपीके' फाईल डाऊनलोड करण्यास भाग पाडले जाते.
3. डिव्हाईसचा ताबा : इन्स्टॉल झाल्यावर हे ॲप्स 'ॲक्सेसिबिलिटी परमिशन' मिळवतात. यामुळे सायबर गुन्हेगार यूजर्सच्या फोनचा ताबा मिळवून आर्थिक गैरव्यवहार करतात.
4. व्हीपीएनचा गैरवापर : काही ॲप्स छुपा व्हीपीएन इन्स्टॉल करून बेकायदेशीर कामांसाठी इंटरनेट ट्रॅफिक वळवतात. तसेच, हे ॲप्स सामान्य सेटिंग्समधून अनइन्स्टॉल करणेही कठीण होते.

सायबर सुरक्षेसाठी महत्त्वाचे नियम

- कोणतेही ॲप केवळ गुगल प्ले स्टोअर किंवा अधिकृत स्टोअरवरूनच डाऊनलोड करा.
- अनोळखी लिंक्स किंवा जाहिरातींवरून येणाऱ्या 'एपीके' फाईल्स इन्स्टॉल करू नका.
- अनोळखी ॲप्सना फोनची 'ॲक्सेसिबिलिटी' परवानगी देऊ नका.
- फोनमधील गुगल प्ले प्रोटेक्ट नेहमी सुरू ठेवा आणि संशयास्पद ॲप्स त्वरित डिलिट करा.
- बँक खाती आणि यूपीआय व्यवहारांवर नियमित लक्ष ठेवा.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा. बां.) विभाग, यांचे कार्यालय

Email : intergratedmumbai.ee@mahapwd.com दूर : २२०१६९७४/७६

ई-निविदा सुचना क्र. ५२

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून अनुभवी कंत्राटदार व पुरवठादार यांच्याकडून खालील कामाकरीता "बी-१"नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) पध्दतीने मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :- सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, सा.बां. प्रादेशिक विभाग मुंबई व कोंकण अंतर्गत कार्यालयातील संगणक हार्डवेअर लॅन व वॅन देखभाल दुरुस्ती करणे. (कालावधी ३ वर्ष)
(अंदाजित रक्कम रुपये ८,९९,५४,३५०/-)

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि. ०१.०९.२०२६ ते दि. ०९.०९.२०२६ रोजी पर्यंत

निविदा पुर्व बैठक :- दिनांक ०४.०९.२०२६ रोजी दुपारी १५.०० बाजता मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा. बां.) प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१.

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) :- दि. ११.०९.२०२६ रोजी

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.com २) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ई-निविदा/४६७०/२६-२७.
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६.
दिनांक :- २५-०८-२०२६.

सही/-
(उदय डी. पालवे)
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक (सा. बां.) विभाग, मुंबई

डीजीआयपीआर/२०२६/२०२७/२५६२

मुख्य कार्यालय विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०३

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र.: व.वि.श.म./पापु/९३८/२०२६
दिनांक : ३१/०८/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय, विरार पूर्व

प्रथम वेळ जाहीर ई-निविदा सूचना

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "जी" अंतर्गत गोखिवरे रेंज ऑफिस येथील सूर्या योजनेची ९०० मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे स्थलांतरित करणे कामाची कोरे निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०१/०९/२०२६ पासून उपलब्ध होणार आहेत. ई-टेंडरिंगबाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

Please visit our official web-site
(https://Mahatenders.gov.in)

सही/-
(सुरेंद्र ठाकरे)
प्र. कार्यकारी अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ)

म्हाडा MHADA

निविदा सूचना

सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता

कार्यकारी अभियंता, विद्युत/ प्राधिकरण, म्हाडा, कलानगर, गृहनिर्माण भवन, पहिला मजला, रूम नं. २१२, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ या कार्यालयामार्फत **कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ** यांच्या अखत्यारीतील खालील कामांसाठी बी-१ (टक्केवारी निहाय) नमुन्यात अटीरहीत - विद्युत परवानाधारक की ज्यांची मुंबई / नवी मुंबई, ठाणे जिल्हा येथिल सां. बां. वि. / म. रा. वि. मंडळ / बृहन्मुंबई महानगर पालिका शासकीय किंवा निमशासकीय संस्था / म्हाडाकडे पुर्व अर्हता पात्र योग्यता नोंदणीकृत असलेले सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता कंत्राटदार यांचेकडे अनुभवीखालील निर्देशित केलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता वर्गाचे विद्युत ठेकेदार व त्यांना विद्युत कामाचा अनुभव असलेले निविदा संकेतस्थळ - www.mahatenders.com द्वारा निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा :- निविदा विक्री - दि. ०४/०९/२०२६ ते दि. १९/०९/२०२६ - सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० पर्यंत.
सिलबंद निविदा सादर - दि. १५/०९/२०२६- सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० पर्यंत.
निविदा उघडण्याचा दिनांक :- १६/०९/२०२६ दुपारी ३.०० वाजताच्या पुढे. Tender Fee :- Rs.590/- (With GST)

अ.क्र.	कामाचे नाव	वर्ग	इसारा रक्कम
०१	प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) टप्पा - १ अंतर्गत शिरढोण, ता. कल्याण, जिल्हा ठाणे येथिल इमारत क्र. १A, १B, १C, १D, ३A, ३B, ३C, ३D, ४A, ४B, ४C, ४D, ६A, ६B आणि ६C मधील जुने व नादुरूस्त झालेले पॅसेज लाईट्स आणि इमारतीच्या परिसरातील लाईट्स बदलून त्याऐवजी नविन LED टयुबलाईट फिटिंग बसविणे) विद्युत यंत्रणेची विशेष दुरूस्ती चे काम. रू. ६,५२,७८५/- (जीएसटी वगळून)	सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता वर्ग	निरंक

CPRO/A/666
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता/विद्युत/ प्राधिकरण

बृहन्मुंबई महानगरपालिका

बी. वाय. एल. नायर धर्मादाय रुग्णालय, डॉ. ए. एल. नायर मार्ग, मुंबई - 400 008.
क्र. NMS/363 दिनांक : 31.08.2026
संक्षिप्त ई-निविदा सूचना

क्र.	तपशील	सुरू होण्याची तारीख	समाप्तीची तारीख
1	इंजे. नॉन आयोनिक कॉन्ट्रास्ट फॉर इंट्राव्हॅस्क्युलर युज आयोडीन कॉन्सन्ट्रेशन 300 मि.ग्रॅ./मि.ली. 100 मि.ली. व्हायल (GEM बिड क्र. GEM/2026/B/7960708)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार
2	इंजे. नॉन आयोनिक कॉन्ट्रास्ट फॉर इंट्राव्हॅस्क्युलर युज आयोडीन कॉन्सन्ट्रेशन 300 मि.ग्रॅ./मि.ली. 100 मि.ली. व्हायल (GEM बिड क्र.GEM /2026/B/7956973)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार
3	इंजे. मिडाझोलम 1 मि.ग्रॅ./मि.ली./आय.एम./आय.व्ही. (5 मि.ली. व्हायल्स/ॲम्प्युल्स)* (GEM बिड क्र.GEM/2026/B/7947950)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार
4	रेबीज ह्युमन मोनोक्लोनल अँटीबॉडी (rdna) 40 आय.यू./मि.ली. (100 आय.यू./2.5 मि.ली. व्हायल) (GEM बिड क्र.GEM /2026/B/7956665)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार
5	कोनिका ड्राय फिल्म फॉर ड्राय कॅमेरा 14" X 17" (GEM बिड क्र. GEM/2026/B/7961957)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार
6	अग्फा ड्राय स्टार फिल्म्स (DT2B) साईझ 8" X 10" (GEM बिड क्र. GEM/2026/B/7962347)	GeM पोर्टलनुसार	GeM पोर्टलनुसार

https://gem.gov.in
संपर्क : डॉ. चेतना कांठारिया (उप अधिष्ठाता)
दूरध्वनी क्र.: 022-23027109, ई-मेल आयडी : medical.store.nair@gmail.com

सही/-
अधिष्ठाता
बी. वाय. एल. नायर धर्मादाय रुग्णालय

PRO/ 1267 /ADV/2026-27

झाडे लावा, झाडे जगवा.

---

onesource

वनसोर्स स्पेशॅलिटी फार्मा लिमिटेड

सीआयएन क्र. : L74140MH2007PLC432497
नोंदणीकृत पत्ता : सायबर वन, युनिट क्र. ९०२, प्लॉट क्र. ४ आणि ६, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३, महाराष्ट्र, भारत, दूरध्वनी : +९१ २२ २७८९ २९२४/+९१ ८० ६७८४ ०७३८
कॉर्पोरेट कार्यालय : स्टार १ आयआयएम बंगळुरू, बिलेकहळ्ळी, बाणेरघट्टा रोड, बंगळुरू- ५६० ०७६, कर्नाटक, भारत, वेबसाईट : www.onesourcecdmo.com
ईमेल : investor-relations@onesourcecdmo.com

१९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) (लिस्टींगनंतरची २री एजीएम), दूरस्थ ई-मतदान आणि अंतिम मुदत दिनांक बाबतची सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, कंपनीची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) (लिस्टींगनंतरची २री एजीएम) बुधवार, सप्टेंबर २३, २०२६ रोजी १७.०० (भारतीय प्रमाणवेळ) वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/अन्य दृक-श्राव्य माध्यमे (ओएव्हीएम) याद्वारे कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या सर्व लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत नियम सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ (सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स) यासह व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सर्वसाधारण सभा आयोजित करण्याबाबत कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली सर्व परिपत्रके (एमसीए परिपत्रके) आणि भारतीय रोखे आणि प्रतिभूती मंडळाद्वारे जारी केलेली सर्व परिपत्रके (सेबी परिपत्रके) यानुसार दिनांक जुलै २६, २०२६ रोजीच्या एजीएम सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर व्यवहार करण्यासाठी आयोजित करण्यात येणार आहे.

एजीएमसाठी व्हीसी/ओएव्हीएम सुविधा ही नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) यांच्याकडून पुरवण्यात येत आहे.

एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २६साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल सोमवार, ऑगस्ट ३१, २०२६ रोजी ज्या सदस्यांचे ई-मेल ॲड्रेसेस कंपनी/डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स/आरटीए यांच्याकडे शुक्रवार, ऑगस्ट २६ रोजीप्रमाणे नोंदणीकृत आहेत, अशांना कंपनीने पाठवले आहेत.

एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल हे कंपनीची वेबसाईट www.onesourcecdmo.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com वर नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल)ची वेबसाईट (www.evoting.nsdl.com) वरसुद्धा उपलब्ध आहेत.

कायद्याचे कलम १०८ कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २०, सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मिटींग्ज (एसएस-२), सेबी लिस्टिंग रेग्युलेन्सचा नियम ४४ आणि एमसीए परिपत्रके या नुसार, एजीएम सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिरित्या आपले मत देण्यासाठी कंपनीच्या सर्व सदस्यांना ई-मतदान सुविधा प्रदान करताना कंपनीला आनंद होत आहे.

एजीएम आणि ई-मतदानासंदर्भातील महत्वाचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :

#	घटक	तपशील
२.	दूरस्थ मतदानाची लिंक	www.evoting.nsdl.com
३.	ई-मतदानासाठी पात्रता निकषासाठी अंतिम मुदत दिनांक	बुधवार, सप्टेंबर १६, २०२३
४.	दूरस्थ ई-मतदान कालावधी	प्रारंभ शुक्रवार, सप्टेंबर १८, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) समाप्त मंगळवार, सप्टेंबर २२, २०२६ रोजी १७.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) सदस्यांनी नोंद घ्यावी की मंगळवार सप्टेंबर २२, २०२६ रोजी १७.०० (भाप्रवे) नंतर दूरस्थ ई-मतदान मोड्यूल एनएसडीलकडून बंद करण्यात येईल. ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल ॲड्रेसेस नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी दूरस्थ ई-मतदानाची पद्धत एजीएम सूचनेत नमूद करण्यात आली आहे. एकदा सदस्याने ठरावावर मतदान केल्यानंतर, त्या सदस्याला नंतर त्यात बदल करण्याची परवानगी मिळणार नाही. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे एजीएमपूर्वी मतदान केले आहे ते एजीएमला व्हीसी/ओएव्हीएम द्वारे उपस्थित राहू शकतात पण ते पुन्हा त्यांचे मत देऊ शकणार नाहीत. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मत दिलेले नाही ते एजीएमच्यावेळी उपलब्ध असलेल्या ई-मतदान प्रणालीद्वारे मत देण्यासाठी पात्र असतील. एजीएमच्या वेळी ई-मतदान हे व्हीसी/ओएव्हीएम प्लॅटफॉर्मशी एकात्मिक असेल.
५.	ई-मतदानासाठी स्क्रूटीनायझर	श्री. प्रदीप भीमसेन कुलकर्णी कंपनी सचिव (आयसीएसआय सदस्यता क्र. एफ७२६० आणि सीपी : ७८३५) मे. व्ही. श्रीधरन अँड असोसिएट्स, कंपनी सचिव, बंगळुरू, ईमेल : pbk@sreedharancs.com
६.	आरटीए संपर्क तपशील	इंटीग्रेटेड रजिस्ट्री मॅनेजमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड २रा मजला, 'केन्सेस टॉवर्स' क्र. १ रामकृष्ण स्ट्रीट, उत्तर उस्मान रोड टी नगर, चेन्नई-६०० ०१७ दूरध्वनी : ०४४-२८१४०८०१ ते २८१४०८०३ फॅक्स : ०४४-२८१४२४७९ ईमेल : Einward@IntegratedIndia.in
७.	एजीएमपूर्वी किंवा वेळी व्हीसीद्वारे सहभाग आणि ई-मतदान याबाबत कोणतीही चौकशी/तक्रार/तांत्रिक सहाय्य आणि समर्थन यासाठी हेल्पलाईन तपशील.	लॉगिनमध्ये कोणतीही तांत्रिक समस्या असलेल्या सदस्यांनी एनएसडीएल हेल्पडेस्कला www.evoting.nsdl.com वर विनंती पाठवावी किंवा ०२२-४८८६७००० वर संपर्क करावा.

तुमचे ई मेल आयडी नोंद करा -

ज्या भागधारकांनी अद्याप त्यांचे ई-मेल आयडी डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्सकडे नोंदणी केले नसतील त्यांनी त्यांचे ईमेल आयडी त्यांच्याकडे असलेल्या शेअरप्रमाणे त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे नोंदवावेत.

एजीएमची सूचना पाठवल्यानंतर जे सदस्य कंपनीचे सदस्य बनले असतील आणि त्यांच्याकडे अंतिम मुदत दिनांक रोजी शेअर्स असतील तर त्यांच्यासाठी ई-मतदानासाठी लॉगिन तपशील-

एजीएमची सूचना पाठवल्यानंतर ज्या व्यक्तीगत सदस्यांनी कंपनीचे शेअर्स मिळवले असतील आणि कंपनीचे सदस्य बनले असतील आणि ई-मतदानासाठी अंतिम मुदत दिनांक रोजी म्हणजे बुधवार, सप्टेंबर १६, २०२६ रोजी त्यांच्याकडे शेअर्स असतील तर त्यांनी एजीएमच्या सूचनेतील 'एजीएम मध्ये व्हीडीओ कॉन्फरन्स/इतर दृक-श्राव्य माध्यम (व्हीसी/ओएव्हीएम) सुविधेद्वारे सहभागी होण्यासाठी आणि दूरस्थ ई-मतदानासहीत इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदान यासाठी सर्वसाधारण सूचना' अंतर्गत नमूद केलेल्या टप्प्यांचे अनुपालन करावे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ वार्षिक अहवाल किंवा एजीएमच्या संदर्भात कोणतेही चौकशी/स्पष्टीकरण/सहाय्य हवे असल्यास सदस्यांनी investor-relations@onesourcecdmo.com वर लिहावे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : ऑगस्ट ३१, २०२६

संचालक मंडळाच्या आदेशाने
वनसोर्स स्पेशॅलिटी फार्मा लिमिटेडसाठी
स्वाक्षरी/- त्रिशा ए
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी
आयसीएसआय सदस्यता क्र. : A47635

जाहीर सूचना

सर्वसामान्य लोकांना येथे सूचना देण्यात येते की "(१) श्री. चंद्रेश आशिष मेहता आणि २) सौ. हेमलता आशिष मेहता" हे **"फ्लॅट क्र. ७०२, ७ वा मजला, मोजमाप ११६.२९ चौरस मीटर (१२५२ चौरस फूटशी समकक्ष) कार्पेट क्षेत्र जो 'दोस्ती मेझ्झो २२ नावाच्या इमारतीतील ए विंगमध्ये'जी लीजहोल्ड प्लॉट क्र. १०३ (पूर्व) सायन-माटुंगा इस्टेट, क्र. सी.एस. क्र. ४०३/६ सायन विभाग रोड क्र. २९, टी. व्ही. चिदम्बरम मार्ग, सायन-पूर्व, मुंबई-४०००२२** (स्थावर मालमत्ता) ज्याचे खालील मालमत्ता परिशिष्टात वर्णन लिहिलेले आहे जो सर्व भारापासून मुक्त आहे, तो विकू इच्छित आहेत आणि आमचे अशील तो खरेदी करू इच्छित आहेत. ज्या व्यक्तींचा सदर मालमत्तेवर वारसा, हिस्सा, विक्री, गहाणवट, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेट, ताबा, मूळ मालकीहक्क कराराचा ताबा किंवा भार अशा कोणत्याही प्रकारचे किंवा अन्य प्रकारे दावा किंवा हक्क असेल तर त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात खाली स्वाक्षरी करणारे यांच्याकडे ही जाहीर **सूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांत कळवावे,** यात अपयश आल्यास अशा प्रकारचे दाव्यांचा विचार न करता व्यवहार पूर्ण केला जाईल आणि अशा व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था वगैरेंचे दावा/दावे, असल्यास ते रद्द आणि/किंवा सोडून दिले आहे असे मानले जाईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

मालमत्तेचे परिशिष्ट

निवासी फ्लॅट क्र. ७०२, मोजमाप ११६.२९ चौरस मीटर (म्हणजे १२५२ चौरस फूट) कार्पेट क्षेत्र, बंद बाल्कनी क्षेत्र म्हणजे ४.९६ चौरस मीटर (म्हणजे ५३ चौरस फूट) आणि २.४० चौरस मीटर (म्हणजे २६ चौरस फूट) युटीलिटी क्षेत्र ७ व्या मजल्यावर २ (दोन) मेकॅनिकल-चेस कार पार्किंग जागेसहीत जी पोडियम ३ स्तरावर आहे, दोस्ती मेझ्झो २२ नावाच्या इमारतीत जी लीजहोल्ड प्लॉट क्र. १०३ (पूर्व) सायन-माटुंगा इस्टेट सी. एस. क्र. ४०३/६ सायन विभाग वर असून रोड क्र. २९, टी. व्ही. चिदंबरम मार्गाच्या बाजूला, सायन-पूर्व, मुंबई-४०००२२ येथे आहे आणि नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्हा मुंबई शहरात आहे आणि दोस्ती मेझ्झो २२ प्रकल्प म्हणून योग्य तऱ्हेने महारेरा प्राधिकरण यांच्याकडे नोंदणीकृत असून प्रमाणपत्र क्र. P51900026976

दिनांक : ०१.०९.२०२६
ठिकाण : मुंबई

प्रतिक मुकेश शेठ
वकील उच्च न्यायालय, मुंबई
ईमेल आयडी : advpratiksheth@gmail.com